TITLE-CODE:- MAHMAR52789

# आपला मराठी टाइम्स

संपादक : अनिल राजाराम पवार    कार्यकारी संपादक: मुकेश आर्मो देवेंद्र    APLA MARATHI TIMES

वर्ष : १ ● अंक : ३० ● साप्ताहिक ● मुंबई ● भाषा : मराठी ● सोमवार : २२ ते २८ जुलै २०२४ ● पृष्ठ - ८ ● मुल्य : ६ रुपये

# योजनांच्या अंमलबजावणीत गैरप्रकार नको !

## लाभार्थ्यांच्या याद्या युद्धपातळीवर तयार करण्याचे मुख्यमंत्र्यांचे आदेश



**मुंबई** : सरकार गोरगरीब, सर्वसामान्यांना लाभ मिळावा यासाठी योजना राबवत असते. अशा घटकांकडून पैसे काढणे हे योग्य नाही, त्यामुळे योजनांच्या अंमलबजावणीत गैरप्रकार झाल्यास तो खपवून घेतला जाणार नाही, असा कठोर इशारा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिला. तसेच सरकारने जाहीर केलेल्या सात योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी लाभार्थ्यांच्या याद्या युद्धपातळीवर तयार करण्याचे आदेशही त्यांनी दिले. मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली विविध महत्त्वाकांक्षी योजनांबाबत आढावा बैठक झाली. वर्षा शासकीय निवासस्थानी झालेल्या बैठकीस उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील, कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा, अल्पसंख्याक विकास मंत्री अब्दुल सत्तार, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सल्लागार मनोज सौनिक, मुख्य सचिव सुजाता सौनिक तसेच महिला व बालविकासमंत्री अदिती तटकरे दूरचित्र संवादाच्या माध्यमातून उपस्थित होत्या. सरकारने जाहीर केलेल्या सात योजनांचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी जिल्हास्तरावर प्रत्येक योजनेसाठी समन्वय अधिकारी नियुक्त करा. या योजनांचा दर आठवड्याला आढावा घेण्यात येईल. मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण कार्यक्रमासाठी शासकीय तसेच विविध प्राधिकरणे, स्थानिक स्वराज्य संस्था, महामंडळे आदी विभागांनी तातडीने अशा पात्र उमेदवारांची नोंदणी करून, त्यांना त्यांच्या पात्रतेनुसार या योजनेत सामावून घ्यावे, जेणेकरून मोठ्या संख्येने उमेदवारांना या योजनेतील विद्यावेतन देणे शक्य होईल, असे आदेश मुख्यमंत्र्यांनी दिले. यावेळी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण, मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना, मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजना, मुलींना मोफत उच्च शिक्षण योजना, मुख्यमंत्री तीर्थक्षेत्र दर्शन योजना, मुख्यमंत्री बळीराजा वीज सवलत योजना आणि मुख्यमंत्री वयोश्री योजना या योजनांचा तपशीलवार आढावा घेण्यात आला. या योजना लाभार्थ्यांपर्यंत पोहचवण्यासाठी प्रभावी कार्यवाही करण्याचे आदेशही मुख्यमंत्र्यांनी दिले.

## पूजा खेडकरांकडून फसवणूक; केंद्रीय लोकसेवा आयोगाचीच कबुली; नियुक्ती रद्द होण्याची चिन्हे



**मुंबई** : वादग्रस्त प्रशिक्षणार्थी सनदी अधिकारी पूजा खेडकर यांनी स्वत: तसेच आई-वडिलांचे नाव, छायाचित्र, स्वाक्षरी, ईमेल, भ्रमणध्वनी क्रमांक आणि पत्ता बदलून फसवणूक केल्याचे केंद्रीय लोकसेवा आयोगाने (यूपीएससी) केलेल्या चौकशीत आढळून आले आहे. त्यामुळे निवड रद्द करण्याबरोबरच त्यांच्यावर फसवणुकीचा गुन्हा दाखल केला जाणार आहे. तत्पूर्वी त्यांना कारणे दाखवा नोटीस बजाविण्यात आली आहे. खेडकर यांनी सादर केलेले दृष्टिदोष प्रमाणपत्र, उत्पन्नाचा दाखला यावरून ओरड सुरू होताच केंद्रीय कार्मिक मंत्रालय तसेच यूपीएससीने स्वतंत्र चौकशी सुरू केली होती. यात खेडकरांनी स्पर्धा परीक्षा उत्तीर्ण होण्याकरिता लोकसेवा आयोगाची विविध पातळ्यांवर बनावट कागदपत्रे सादर करून फसवणूक केल्याचे निष्पन्न झाले आहे. खुल्या वर्गातील विद्यार्थ्यांना सहा वेळा तर ओबीसी वर्गातील विद्यार्थ्यांना नऊ वेळा संधी मिळते. ओबीसी प्रमाणपत्र सादर केलेल्या खेडकर यांनी या मर्यादेपेक्षा अधिक वेळा परीक्षा देताना स्वत:, आई व वडिलांचे नाव, छायाचित्र, स्वाक्षरी, घरचा पत्ता, ईमेल, भ्रमणध्वनी क्रमांक आदी सारेच बदलल्याचे निष्पन्न झाले आहे. त्यानंतर कायदेशीर व फौजदारी कारवाई यूपीएससीने सुरू केली आहे. सर्वात आधी कारणे दाखवा नोटीस बजाविण्यात आली असून त्यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर फसवणुकीचा गुन्हा दाखल केला जाणार आहे. खेडकरांनी मनमानी केली नसती व जिल्हा प्रशिक्षण पूर्ण केले असते तर त्यांची राज्य शासनाच्या सेवेत नियुक्ती होऊ शकली असती. मात्र हे सगळे होत असताना यूपीएससीच्या लक्षात कसे आले नाही, हाच खरा प्रश्न आहे. फसवणूक केली होती तर निकाल कसा जाहीर करण्यात आला? वैद्यकीय चाचणी करण्याचे टाळल्यानंतरही त्यांची राज्याच्या सेवेत नियुक्ती कशी झाली? असे अनेक प्रश्न निर्माण होत आहेत. आता मात्र खेडकरांवरील कारवाईच्या आदेशात लोकसेवा आयोगाने आपला निष्पक्षपातीपणा आणि परीक्षा प्रक्रियेच्या पावित्र्याबद्दल स्वत:चीच पाठ थोपटून घेतली आहे.

## सरकारी अधिकाऱ्यांच्या दुटप्पी वृत्तीमुळेच बेकायदा बांधकामे - उच्च न्यायालय



**मुंबई** : आवश्यक त्या परवानग्या मिळविण्यासाठी सरकारी अधिकारी सर्वसामान्यांना एका कार्यालयातून दुसऱ्या कार्यालयात खेटा घालण्यास भाग पाडतात. दुसरीकडे, बड्या उद्योगांचा प्रश्न आला की हेच सरकारी अधिकारी त्यांच्यासाठी पायघड्या घालतात. सरकारी अधिकाऱ्यांची ही दुटप्पी वृत्ती बेकायदा बांधकामांना जबाबदार आहे, अशा शब्दात उच्च न्यायालयाने सरकारी कारभारावर ताशेरे ओढले. सरकारी अधिकारी सर्वसामान्यांना आवश्यक त्या परवानग्या मिळविण्यासाठी केवळ धावपळ करण्यास भाग पाडतात. आपल्यासमोरील प्रकरणातही याचिकाकर्त्याला परवानगी मिळविण्यासाठी एका अधिकाऱ्याकडून दुसऱ्या अधिकाऱ्याकडे पाठवले गेले. परंतु, एकाही अधिकाऱ्याने त्याला मदत केली नाही किंवा कोणतेही स्पष्ट उत्तर दिले नाही, असे खडेबोलही न्यायमूर्ती महेश सोनक आणि न्यायमूर्ती कमल खाता यांच्या खंडपीठाने सुनावले. सर्वसामान्यांना त्रास देऊन तुम्हाला कोणता आनंद मिळतो? याचिकाकर्त्यांचा अर्ज निव्वळ संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या पर्यावरणीयदृष्ट्या संवेदनशील क्षेत्राच्या (ईएसझेड) देखरेखीसाठी नेमण्यात आलेल्या समितीला उद्देशून नसल्यामुळे समिती अर्जावर विचार करू शकत नाही, असे म्हणणे याचिकाकर्त्यासाठी किती निराशाजनक आहे. वनसंरक्षक किंवा राष्ट्रीय उद्यानाच्या संचालकांच्या ऑक्टोबर २०२१ च्या उत्तरातही कोणत्या आधारावर याचिकाकर्त्याचा भूखंड वनक्षेत्रात येतो, याची कोणतीही माहिती नमूद केलेली नाही. समितीचा दृष्टीकोन दुर्दैवी असून अनेक वर्षांपासून रखडलेला याचिकाकर्त्याच्या अर्जाचा समितीने विचार करणे आवश्यक होते, असे ताशेरेही न्यायालयाने ओढले. याचिकाकर्त्याऐवजी या अधिकाऱ्याकडे बड्या उद्योग चालवणाऱ्यांचे प्रतिनिधी परवानग्यांसाठी आले असते तर कदाचित हे अधिकारी त्यांच्या मागे-मागे फिरले असते, अशी टिप्पणीही न्यायमूर्ती सोनक यांनी केली. त्याचवेळी, देखरेख समितीने याचिकाकर्त्याच्या अर्जावर ३० दिवसांच्या आत निर्णय घेण्याचे आदेश दिले. याचिकाकर्त्याची मागणी कायद्यानुसार असेल तर समिती त्वरित त्याला ना हरकत प्रमाणपत्र (एनओसी) देईल आणि निर्णय घेण्यास कोणतीही टाळाटाळ करणार नाही, असेही न्यायालयाने बजावले. संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या सीमेपासून ३६ मीटर अंतरावर बंगला बांधण्यासाठी याचिकाकर्ते शैलेश मोरे यांनी महापालिका प्रशासनाकडे जुलै २०२० मध्ये अर्ज केला होता. भूमी अभिलेख जिल्हा निरीक्षकांच्या ३१ ऑक्टोबर १९७४ च्या पत्रानुसार, संबंधित जमीन कोणत्याही प्रकारे राष्ट्रीय उद्यानाचा भाग नाही हे स्पष्ट केलेले असतानाही समितीने याचिकाकर्त्याला ना हरकत देण्यास नकार दिला. तसेच, परवानगी मागण्यासाठी समितीऐवजी सदस्य सचिवांचे नाव अर्जात नमूद केल्यामुळे त्यांना परवानगी नाकारण्यात आल्याचा दावा याचिकाकर्त्याने याचिकेद्वारे केला आहे.

# भाजपचा सामना करण्यासाठी काँग्रेसकडूनही प्रवक्त्यांची फौज

**मुंबई** : आगामी विधानसभा निवडणुकीसाठी भाजपने प्रसिद्धी माध्यमांमध्ये पक्षाची भूमिका मांडण्यासाठी तसेच विरोधकांच्या आरोपांना प्रत्युत्तर देण्याकरिता प्रवक्त्यांची भलीमोठी यादी तयार केली असताना त्याला प्रत्युत्तर देण्यासाठी काँग्रेसने नेते व प्रवक्त्यांची १५ जणांची फौज तयार केली आहे. परिणामी भाजप आणि काँग्रेसमध्ये आता वाकयुद्ध बघायला मिळणार आहे. सत्ताधारी पक्षाकडून खोटे कथानक तयार करून राज्यातील जनतेची दिशाभूल करण्याचे काम सुरू आहे. भाजपचा माहिती तंत्रज्ञान विभाग विरोधी पक्षांच्या नेत्यांचे फोटो, चित्रफिती खाडाखोड करून किंवा त्यात बदल करून समाज माध्यमांमधून प्रसारित करीत आहे. राज्यातील जनतेला



सत्य कळावे आणि सत्ताधार्यांच्या खोट्या प्रचाराला पायबंद घालण्यासाठी १५ नेत्यांकडे जबाबदारी सोपविल्याचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी सांगितले. प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे नेते बाळासाहेब थोरात, विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, माजी प्रदेशाध्यक्ष माणिकराव ठाकरे, विधान परिषदेतील काँग्रेस पक्षाचे गटनेते सतेज पाटील, प्रदेश कार्याध्यक्ष नसीम खान, खासदार चंद्रकांत हंडोरे, माजी मंत्री डॉ. नितीन राऊत, यशोमती ठाकूर, अमित देशमुख, डॉ. विश्वजीत कदम, मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे, सचिन सावंत, चरणसिंग सप्रा या १५ नेत्यांकडे जबाबदारी सोपावण्यात आली आहे. हे नेते पत्रकार परिषदा घेऊन आणि माध्यमाशी संवाद साधून काँग्रेस पक्षाची भूमिका जनतेपर्यंत मांडणार आहेत. समन्वयाची जबाबदारी प्रदेश काँग्रेसचे माध्यम समन्वयक श्रीनिवास बिक्कड यांच्याकडे असेल. भाजपने सकाळपासून सायंकाळपर्यंत पक्षाची भूमिका मांडण्यासाठी विविध नेत्यांची फौजच सज्ज केली आहे. त्यात पंकजा मुंडे, आशीष शेलार, सुधीर मुनगंटीवार, रावसाहेब दानवे, अशोक चव्हाण आदींचा समावेश आहे. भाजपच्या या यादीत आमदार नितेश राणे यांना मात्र स्थान देण्यात आलेले नाही. सध्या संजय राऊत यांच्या आरोपांना उत्तर देण्याची जबाबदारी राणे पार पाडतात. पण नवीन यादीत राणे यांचे नाव नसल्याबद्दल आश्चर्य व्यक्त केले जाते.

# रखडलेले प्रकल्प मार्गी लावा - रेल्वेमंत्री


**मुंबई** : मध्य रेल्वे आणि पश्चिम रेल्वेवरील रखडलेल्या प्रकल्पांना गती देण्याचे आणि शक्य तितक्या लवकर उपनगरीय रेल्वे मार्गाची क्षमता वाढवण्याच्या सूचना केंद्रीय रेल्वेमंत्री आश्विनी वैष्णव यांनी दिल्या. चर्चगेट येथील पश्चिम रेल्वे मुख्यालयात शुक्रवारी मध्य रेल्वे पश्चिम



रेल्वे, कोकण रेल्वे आणि मुंबई रेल्वे विकास कॉर्पोरेशनच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसह आश्विनी वैष्णव यांची बैठक पार पडली. यावेळी सिग्नलिंग सिस्टीम, कवच आणि सीबीटीसी (कम्युनिकेशन-आधारित ट्रेन कंट्रोल सिस्टीम) आदी योजनांचा आढावा घेण्यात आला. मध्य रेल्वेवरील परळ, कल्याण, एलटीटी आणि पनवेल कळंबोली येथे नियोजित मेगा कोचिंग टर्मिनल्सद्वारे क्षमता वाढवणे, पश्चिम रेल्वेवरील पाचवी आणि सहावी मार्गिका, विरार-डहाणू चौपदरीकरण, हार्बर मार्गाच्या विस्ताराबाबतच्या मुद्द्यांवर चर्चा करण्यात आली. प्रवासी सुविधा वाढवण्याच्या उद्देशाने प्रकल्पांसह विविध स्थानकांवर आणि इतर महत्त्वाच्या स्थानकांवर पायाभूत सुविधांच्या विकासावर चर्चा करण्यात आली. एमयूटीपी तीन आणि एमयूटीपी तीन ए यासारख्या प्रकल्पांच्या प्रगतीची माहिती त्यांनी जाणून घेतली. तसेच लिफ्ट, सरकते जिने, उड्डाणपूल उभारण्यासह सर्व स्थानकांवर महत्वपूर्ण सुधारणा करण्यात यावी, मुंबईच्या रेल्वे पायाभूत सुविधा मजबूत करण्यासाठी सुरू असलेल्या कामांना वेग द्यावा, भविष्यातील अतिरिक्त वातानुकूलित लोकल वाढवण्यावर विशेष लक्ष देण्याच्या सूचना अश्विनी वैष्णव यांनी केल्या.

# आरटीई कायद्यातील दुरुस्ती घटनाबाह्य, उच्च न्यायालयाचा निर्वाळा

**मुंबई** : विनाअनुदानित शाळांनाही शिक्षण हक्क कायद्यांतर्गत (आरटीई) राखीव आणि वंचित घटकांतील विद्यार्थ्यांसाठी आरक्षित असलेल्या २५ टक्के जागांवरील प्रवेश द्यावेच लागतील, असे उच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे. प्रवेश प्रक्रियेतून खासगी विनाअनुदानित शाळा वगळण्याचा राज्य सरकारचा निर्णय उच्च न्यायालयाने शुक्रवारी घटनाबाह्य ठरवला. यासंदर्भातील राज्य सरकारचे ६ मार्च रोजीचे परिपत्रकही मुख्य न्यायमूर्ती देवेंद्र कुमार उपाध्याय आणि न्यायमूर्ती अमित बोरकर यांच्या खंडपीठाने रद्द केले. मात्र, दुरुस्तीला स्थगिती देण्यापूर्वी खासगी शाळांनी या कोट्यातून दिलेले प्रवेश तसेच राहतील, असेही न्यायालयाने स्पष्ट केले. त्याचवेळी, २५ टक्के कोट्यातील प्रवेश भरले जातील, असेही न्यायालयाने राज्य सरकारचा निर्णय घटनाबाह्य ठरवताना नमूद केले. न्यायालयाने ६ मे रोजी सरकारच्या निर्णयाला स्थगिती दिली होती व प्रवेश प्रक्रिया आधीच्या नियमानुसार राबवण्याचे आदेश दिले होते. राज्य सरकारच्या निर्णयाच्या विरोधातील याचिकांवरील निर्णय उच्च न्यायालयाने गेल्या आठवड्यात राखून ठेवला होता. त्यावर, न्यायालयाने शुक्रवारी उपरोक्त निर्णय




दिला. दरम्यान, आरटीई प्रवेशांची वाढती संख्या आणि त्यामुळे येणाऱ्या आर्थिक अडचणींमुळे कायद्यात दुरूस्ती करण्यात आल्याचा दावा सरकारने निर्णयाच्या समर्थनार्थ युक्तिवादाच्या वेळी केला होता. मात्र, न्यायालयाने त्याबाबत प्रश्न उपस्थित केला होता. प्रत्येक मुलाला शिक्षण मिळावे आणि कोणीही प्राथमिक शिक्षण मिळण्यापासून वंचित राहू नये यासाठी सरकार बांधील आहे. सरकार आपले कर्तव्य पार पाडत आहे. परंतु, सरकारी शाळांतील प्रवेश घटत चालले आहेत. याउलट, आरटीई प्रवेशासाठी राखीव असलेल्या जागांच्या तुलनेत येणाऱ्या अर्जांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. परिणामी, सरकारी शाळेतील शिक्षक अतिरिक्त झाले आहेत. शिक्षणासाठी कोट्यवधी रुपये खर्च केला जातो. आर्थिक अडचणीही सरकारला भेडसावत आहेत. याशिवाय, आरटीईअंतर्गत प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांचा आठवीपर्यंतच्या शिक्षणाचा खर्च सरकारतर्फे उचलला जातो. खासगी शाळेतील नववी, दहावीचा खर्च गरीब कुटुंबाला परवडणारा नाही. शिवाय, खासगी शाळेत विविध उपक्रम राबविले जातात. त्यासाठी स्वतंत्र शुल्क आकारले जाते. हे शुल्क न भरल्याने मुलाला विविध उपक्रमात सहभागी होता येत नाही. गरीब विद्यार्थ्यांचे खच्चीकरण होते, असा दावा अतिरिक्त सरकारी वकील ज्योती चव्हाण यांनी कायदा दुरूस्तीचा निर्णय का घेण्यात आला आणि तो योग्य कसा हे न्यायालयाला पटवून देताना केला होता. मुलांनी शिक्षणापासून वंचित राहू नये याची आणि त्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याची जबाबदारी पूर्णपणे सरकारची आहे. सरकारने दर्जेदार शाळा उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. परंतु, सरकार आपले हे घटनात्मक कर्तव्य बजावण्यात अपयशी ठरले आहे, असा दावा खासगी शाळांच्यावतीने करण्यात आला. न्यायालयाचा अंतरिम स्थगितीचा निर्णय हा व्यावसाय करण्याच्या आपल्या मूलभूत अधिकारांचे उल्लघन असल्याचा दावाही शाळांतर्फे करण्यात आला. शिक्षणापासून वंचित राहावे लागू नये यासाठी शिक्षण हक्क कायदा करण्यात आला. तसेच, आर्थिकदृष्ट्या मागासवर्गातील मुलांना चांगले शिक्षण मिळावे यासाठी खासगी शाळांमध्ये २५ टक्के राखीव जागा ठेवण्याची तरतूद करण्यात आली. या तरतुदीचे पालन करणे कायद्याने बंधनकारक करण्यात आले आहे. त्यामुळे, केंद्र सरकारही ही तरतूद बदलू शकत नाही. असे असताना राज्य सरकारने कायदा दुरूस्ती करून आरटीईतंर्गत राखीव आणि वंचित घटकांतील विद्यार्थ्यांसाठी आरक्षित असलेल्या २५ टक्के जागांवरील प्रवेश प्रक्रियेतून खासगी विनाअनुदानित शाळा वगळण्याच्या निर्णय घेतला. सरकारचा हा निर्णय कायद्याचा हेतू नष्ट करणारा आणि घटनाबाह्य आहे, असा दावा याचिकाकर्त्यांतर्फे करण्यात आला होता.

# अल्पवयीन मुलींना देहविक्री करण्यास भाग पाडणाऱ्या तिघांना अटक

**मुंबई** : पैशांचे आमिष दाखवून अल्पवयीन मुलींना देहविक्री करण्यास भाग पाडणाऱ्या तिघांना गुन्हे शाखेने कुर्ला परिसरातून अटक केली. अटक आरोपींमध्ये दोन महिलांचा समावेश असून याप्रकरणी कुर्ला पोलीस



अधिक तपास करीत आहेत. एक टोळी पश्चिम बंगाल, उत्तर प्रदेश आणि बिहारमधून काही अल्पवयीन मुलींना मुंबईत देहविक्रीसाठी घेऊन येत असल्याची माहिती गुन्हे शाखा युनिट ५ च्या अधिकाऱ्यांना मिळाली. त्यानुसार अधिकाऱ्यांनी गुरुवारी कुर्ला रेल्वे स्थानकाबाहेर सापळा रचला होता. मिळालेल्या वर्णनाच्या दोन महिला तेथे आल्या. त्यांच्यासोबत अन्य एक इसम आणि दोन अल्पवयीन मुली होत्या. पोलिसांनी तत्काळ या सर्वांना ताब्यात घेतले आणि पोलीस ठाण्यात आणले. चौकशीदरम्यान आरोपींनी गुन्ह्याची कबुली दिली. पोलिसांनी दोन अल्पवयीन मुलींची सुटका करून तिन्ही आरोपीना अटक केली.

# मुंबईतील प्राणीप्रेमी महिलेवर बलात्काराचा प्रयत्न, जीवे मारण्याची धमकी देणाऱ्या आरोपीला बिहारमधून अटक

**मुंबई** : ३८ वर्षीय महिलेवर बलात्कार करण्याचा प्रयत्न अयशस्वी ठरल्यानंतर तिला मारण्याचा प्रयत्न करणाऱ्या एका वॉचमनला मुंबई पोलिसांनी अटक केली आहे. ही ३८ वर्षीय महिला ब्रँड मॅनेजमेंट अँड बिजनेस डेव्हलपमेंट फर्मची वरिष्ठ कर्मचारी असून सोमवारी मढ, मालाडमध्ये तिच्याबरोबर ही घटना घडली. या घटनेतील आरोपी २८ वर्षांचा असून त्याला बिहारमधून अटक करण्यात पोलिसांच्या पथकाला यश आले आहे. डीसीपी झोन-११ आणि मालवणी पोलिस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक चिमाजी आढाव यांच्या मार्गदर्शनाखालील पोलिसांच्या पथकाने आरोपीला बिहारमधून अटक केली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, हा आरोपी मालाड (पश्चिम) मढ परिसरातील व्यासवाडीमधील एका प्रोडक्शन हाऊसमध्ये केअरटेकर आणि वॉचमन म्हणून काम करत होता. प्रोडक्शन हाऊस असलेल्या बंगल्याच्या शेजारच्या बंगल्यामध्येच ती पीडिता राहते. पीडिता प्रचंड प्राणी प्रेमी असून तिच्याकडे दहा-बारा मांजरे पाळलेली आहेत. तिच्या याच प्राणी प्रेमाचा गैरफायदा उचलण्याचा प्रयत्न आरोपीने केला. पोलिसांमधील सूत्रांनी दिलेल्या




माहितीनुसार, सोमवारी दुपारी आरोपीने पीडित महिलेला म्हटले की, तिने पाळलेली तीन मांजरे त्यांच्या प्रोडक्शन हाऊसच्या बंगल्यामध्ये आली आहेत आणि तिने त्यांना घेऊन जावे. जेव्हा पीडित महिला त्या प्रोडक्शन हाऊसमध्ये तिच्या मांजरांना आणायला गेली; तेव्हा त्या आरोपी वॉचमनने तिला पकडले आणि तिच्याकडे शारीरिक सुखाची मागणी लावून धरली. पीडित महिलेने प्रतिकाराचा प्रयत्न केला तेव्हा तो तिला जीवे मारण्याची धमकी देऊ लागला. त्याने तिला बंगल्याच्या आतील खोलीमध्ये जबरदस्ती नेण्याचा प्रयत्न केला. ती प्रतिकाराचा प्रयत्न करत राहिली पण आरोपीने तिच्याकडून जबरदस्तीने शारीरिक सुख मिळवण्याचा प्रयत्न सुरुच ठेवला. जेव्हा तिने जोरदार प्रतिकार चालवला तेव्हा त्याने तिच्यावर चाकूने हल्ला करण्याचा प्रयत्न केला, अशी माहिती पोलिसांनी दिली. या सगळ्या झटापटीमध्ये पीडित महिलेच्या मानेवर आणि पोटावर गंभीर जखमा झाल्या आहेत. या आरोपीने महिलेला प्रोडक्शन हाऊसच्या एका खोलीमध्ये बंद केले आणि तो तिथून पळून गेला. पुढे पोलीस म्हणाले की, या महिलेने जवळच राहणाऱ्या आपल्या एका मित्राला फोन करुन मदत मागितली. पीडित महिलेचा मित्र तातडीने आला आणि त्याने तिची सुटका करुन तिला कोकिलाबेन हॉस्पिटलमध्ये नेले. त्यानंतर पोलीस तातडीने दवाखान्यात हजर झाले आणि त्यांनी तिचा जबाब नोंदवला. दोन दिवसांच्या उपचारानंतर पीडित महिलेला दवाखान्यातून घरी पाठवण्यात आले. वरिष्ठ पोलीस निरिक्षक आढाव म्हणाले की, ग्आरोपीला मंगळवारी बिहारमधून अटक करण्यात आले असून त्याला बुधवारी मुंबईमध्ये आणण्यात आले. त्याला त्याच दिवशी न्यायालयासमोर सादर केले असून त्याला २२ जुलैपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. आरोपीवर अनेक गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. त्यामध्ये भारतीय न्याय संहितेच्या कलम ६२ (गुन्हा करण्याचा प्रयत्न), ६४ (बलात्कार), ७४ (विनयभंग), ७५ (लैंगिक छळ), १०९ (हत्येचा प्रयत्न), ११८(१) (धोकादायक शस्त्राने दुखापत करणे किंवा गंभीर दुखापत करणे), १२७ (२), (जबरदस्तीने डांबून ठेवणे) अशा कलमांचा समावेश आहे.

### बेकायदेशीर विक्री, तरुणींच्या जीवाला धोका

# वसई विरार शहरात गर्भपात गोळ्यांचा काळाबाजार

**वसई** : मुलींना गर्भपातासाठी बेकायदेशीररिच्या गर्भपाताच्या गोळ्या (एमटीपी किट) काळ्या बाजारात विक्री केली जात असल्याचे प्रकरण समोर आले आहे. वालीव पोलिसांनी या प्रकरणी एका आरोपीवर गुन्हा दाखल केला असून गर्भपाताच्या गोळ्यांचा मोठा साठा जप्त केला आहे. या रॅकेट मध्ये डॉक्टर, औषध विक्रेते यांचा देखील सहभाग असून पोलीस त्यांचा शोध घेत आहेत. शहरातील खासगी डॉक्टर तसेच औषध विक्रेते (मेडिकल स्टोअर्स) मध्ये बेकायदेशीररित्या गर्भपाताच्या गोळ्यांची (एमटीपी किट) विक्री केली जात असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. या संचात (किट) मध्ये ५ गोळ्या असतात. या गोळ्यांची किंमत अवघी ६० रुपये असते. मात्र काळ्या बाजारात या गोळ्या ५ ते १० हजार रुपयांना दिल्या जात असल्याचे उघडकीस आले आहे. वालील पोलिसांनी या प्रकरणी नालासोपाराच्या शिर्डी नगर येथे सापळा लावून अजित पांडे (४२) याला ताब्यात घेतले. औषध विक्रीचा कुठलाही परवाना त्याच्याकडे नव्हता. तरी या गोळ्या तो औषध विक्रेते आणि खासगी डॉक्टरांना विकत होता अशी माहिती तपासात समोर आली आहे. त्याच्याविरोधात औषध निरीक्षक किशोर रांजणे यांनी दिलेल्या तक्रारीनुसार औषध व सौंदर्य




प्रसाधन कायद्याच्या विविध कलमाअंतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले आहे. आरोपीकडून अशा गोळ्यांचे ३०० संच जप्त करण्यात आले आहे. त्याची किंमत १ लाख ३० हजार एवढी आहे. या गोळ्या बनविणारी कंपनी पुण्यात आहे. तेथून त्या उत्तरप्रदेशात वितिरत केल्या जात होत्या. आरोपी पांडे हा तेथून गोळ्या आणून विक्री करत होता, अशी माहिती वालीव पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक संदेश राणे यांनी दिली. काही खासगी दवाखान्याती डॉक्टर्स वाटेल त्या किंमतीला गोळ्या विकत होते. या संचावर बारकोड असल्याने कुठे वितिरत केल्या गेल्या, कुणी विकल्या त्याची पाळेमुळे शोधून कारवाई केली जाणार आहे, अशी माहिती राणे यांनी दिली. शस्त्रक्रियेविना गर्भपात करण्यासाठी गर्भपाताच्या गोळ्या (एमटीपी किट) स्त्री रोग तज्ज्ञांकडून दिल्या जातात. त्यासाठी आधी संबंधित महिलांची शारिरिक तपासणी केली जाते त्यानुसार या गोळ्यांची किती मात्रा (डोस) द्यायचा ते ठरवले जाते. डॉक्टरांच्या चिठ्ठी (प्रिस्किप्रशन) शिवाय या गोळ्यांची विक्री करणे बेकायदेशीर आहे. अशा गोळ्या डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय घेतल्या तर जीवावर बेतू शकते, असे पालिक्या मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ भक्ती चौधरी यांनी सांगितले. शहरातील डॉक्टर्स अशा गोळ्यांची विक्री करत असतील तर त्यांच्यावर कारवाई केली जाईल असेही डॉ चौधरी यांनी सांगितले. गर्भपात गोळ्यांची बेकायदेशीर विक्री सुरू असल्याची माहिती मिळल्यानंतर आम्ही सापळा लावून ही कारवाई केली आहे. याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जयराज रणावरे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, वालीव बदनामी होऊ नये म्हणून मुली बेकायदेशीर मार्गाने मिळालेल्या गर्भपाताच्या गोळ्या घेतात. परंतु हे धोकादायक आहे. मुलींनी स्त्रीरोगतज्ज्ञांकडून तपासणी करून गोळ्या घ्याव्यात. डॉक्टरांकडे रुग्णांची गोपनियता राखली जाते असे मुख्य आरोग्य अधिकारी डॉ भक्ती चौधरी यांनी सांगितले.

# धार्मिक स्थळांवर पोलिसांचे बारकाईने लक्ष

**ठाणे** : शिळ-डायघर येथील एका धार्मिक स्थळाच्या परिसरात तीन जणांनी महिलेवर सामूहिक लैंगिक अत्याचार करून तिची हत्या केल्याचा प्रकार उघडकीस आला होता. या प्रकारानंतर ठाणे पोलिसांनी धार्मिक स्थळांच्या परिसरात बारकाईने लक्ष घालण्यास सुरूवात केली आहे. पोलिसांचे यापूर्वीच गुड मॉर्गिग पथक तसेच रात्रीच्या वेळेत गस्ती पथके कार्यरत आहेत. ठाणे जिल्हा भूमिपूत्र संघटना आणि ओबीसी एकीकरण समितीने देखील पोलीस आयुक्तांकडे धार्मिक स्थळांवरील सेवेकऱ्यांच्या पोलीस पडताळणी करण्याची मागणी करून त्यांसदर्भाचे पत्र पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे यांना दिले आहे. नवी मुंबई येथे राहणाऱ्या विवाहितेचे तिच्या सासरकडील नातेवाईकांसोबत वाद झाले होते. त्यामुळे ती ६ जुलैला शिळगाव येथील एका धार्मिक स्थळात आली होती. तेथील तीन सेवेकऱ्यांनी तिच्या चहामध्ये भांगेच्या गोळ्या मिसळून तिच्यावर सामूहिक लैंगिक अत्याचार केले. महिला शुद्धीत आल्यानंतर तिने



आरडाओरड करण्यास सुरूवात केली. ती पळून जात असताना तिघांनी तिला मारहाण करून तिचे डोके जमीनीवर आपटले. त्यानंतर तिचा गळा दाबून तिची हत्या केली. तिचे प्रेत मंदिराच्या परिसरात एका झुडपामध्ये फेकून दिले. या गंभीर प्रकरणात पोलिसांनी श्यामसुंदर शर्मा, संतोषकुमार मिश्रा आणि राजकुमार पांडे या तिघांना अटक केली आहे. असे असले तरी धार्मिक स्थळातील भाविकांच्या सुरक्षेचा मुद्दा उपस्थित होऊ लागला आहे. ठाणे पोलीस आयुक्तालय क्षेत्रात मोठ्याप्रमाणात धार्मिक स्थळे आहेत. या धार्मिक स्थळांची पोलिसांकडून पाहणी केली जात असते. ठाणे आयुक्तालय क्षेत्रात धार्मिक स्थळांच्या क्षेत्रात गुड मॉर्निग पथक आणि रात्रीच्या वेळेत गस्ती पथके तैनात असतात. परंतु या प्रकरणानंतर आता धार्मिक स्थळांच्या क्षेत्रात बारकाईने लक्ष देण्यास सुरुवात केली आहे. यास सह पोलीस आयुक्त ज्ञानेश्वर चव्हाण यांनी दुजोरा दिला आहे. डायघर येथे झालेल्या प्रकारानंतर सर्वच धार्मिक स्थळांवर सीसीटीव्ही लावणे आणि येथे कार्यरत असलेल्या सेवेकऱ्यांची पोलीस पडताळणी करण्याची मागणी ठाणे जिल्हा भूमिपुत्र संघटना आणि ओबीसी एकीकरण समितीने केली आहे. त्यांच्या प्रतिनिधींनी पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे यांची भेट घेऊन निवेदन सादर केले.

# आमदार राजू पाटील यांचा नातेवाईक असल्याचे सांगून ५० हून अधिक जणांना गंडा घालणारा अटकेत



**डोंबिवली** : आपण काटई येथील आमदार राजू पाटील यांचा भाचा आहोत. आपण त्यांच्या सोबतच्या बैठकीत भेटलो होतो. आपण तुम्हाला ओळखतो असे ठाणे, मुंबई परिसरातील रस्त्याने चाललेल्या पादचाऱ्यांना थांबवून सांगायचे. पादचाऱ्यांना बोलण्यात गुंतवून त्यांना भुरळ घालून त्यांच्या जवळील सोन्याचा, रोख रक्कम घेऊन पळून जायचे. अनेक महिने आमदार पाटील यांच्या नावाने लबाड्या करणाऱ्या भिवंडीजवळील शेलार गावातील एका भामट्याला विष्णुनगर पोलिसांनी नवी मुंबईतून कौशल्याने मंगळवारी अटक केली. विजय दत्ताराम तांबे (५५, रा. शेलार गाव, भिवंडी) असे आरोपीचे नाव आहे. त्याने ठाणे, मुंबई परिसरात अशाप्रकारचे ५० हून अधिक गुन्हे केले असल्याची कबुली विष्णुनगर पोलिसांना दिली आहे. अनेक दिवस पोलीस या भामट्याच्या मागावर होते. विष्णुनगर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय पवार यांनी सांगितले, गेल्या महिन्यात डोंबिवलीतील रेल्वे मैदान भागातील सोसायटीत राहणारे सेवानिवृत्त गणेश कुबल महात्मा फुले रस्त्यावरील बँकेत पैसे काढण्यासाठी आले होते. पैसे काढल्यानंतर ते गुप्ते रस्त्यावर खरेदीसाठी गेले. गोपी मॉल भागातील रस्त्याने पायी घरी चालले होते. तेवढ्यात त्यांना एका इसमाने हाक मारून थांबवले. अनोळखी इसमाने मला ओळखले का. मी आमदार राजू पाटील यांचा भाचा. आपण एका बैठकीत भेटलो होतो असे बोलून कुबल यांच्याशी इसमाने लगट केली. आपण तुम्हाला ओळखूनही तुम्ही मला ओळखत नाहीत याचे आश्चर्य वाटते. असे बोलून कुबल यांचा विश्वास इसमाने संपादन केला. बोलण्याच्या गडबडीत इसमाने कुबल यांना भुरळ घालून त्यांच्या खिशातील आठ हजार रुपये रोख, गळ्यातील सोनसाखळी असा ऐवज काढून घेतला. तुम्ही वृद्ध आहात. कोणी पण ते लुटेल असे बोलून इसमाने रोख रक्कम, सोनसाखळी ऐवज एका रुमालात गुंडाळून तो कुबल यांच्या विजारीच्या मागील खिशात ठेवल्याचा भास निर्माण केला. या इसमाच्या जवळ अन्य एक इसम दूरवर उभा होता. इसमाने कुबल यांना आता तुम्ही घरी जा. ओळख ठेवा, असे बोलून कुबल यांना जाण्याचा इशारा केला. कुबल काही अंतर पुढे गेल्यावर त्यांनी मागील विजारीच्या खिशात पैसे, सोनसाखळीचे पुडके नव्हते. ते पुन्हा माघारी आले तोपर्यंत तो इसम आणि त्याचा साथीदार पुडके घेऊन पसार झाले होते. कुबल यांनी विष्णुनगर पोलीस ठाण्यात तक्रार केली होती. पोलिसांनी गोपी मॉल भागातील सीसीटीव्ही चित्रण तपासून आरोपीची ओळख पटवून त्याचा शोध सुरू केला होता. वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय पवार, पोलीस निरीक्षक गहिनाथ गमे, साहायक पोलीस निरीक्षक सचीन लोखंडे, पोलीस उपनिरीक्षक दीपकुमार भवर यांच्या मार्गदर्शनाखालील तपास पथकाला आरोपी विजय तांबे नवी मुंबई भागात येणार आहे अशी गुप्त माहिती मिळाली. पोलिसांनी मंगळवारी नवी मुंबईत सापळा लावून आरोपी तांबे याला अटक केली. त्याने ठाणे, मुंबई परिसरात अशाप्रकारे ५० हून अधिक गुन्हे केल्याची कबुली पोलिसांना दिली आहे.

# आमदार जितेंद्र आव्हाडांसह २२ जणांवर गुन्हे दाखल; खोट्या गुन्ह्यात अडकविल्याचा तक्रारदारीत आरोप

**ठाणे** : राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांच्यासह २२ जणांविरोधात मुंब्रा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विनयभंगप्रकरणी दाखल केलेला गुन्हा मागे घेण्याच्या तसेच त्याचा बदला घेण्याच्या उद्देशातून खोटा गुन्ह्यात अडकवून मानसिक त्रास दिल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. याप्रकरणात आरोपींना अटक करण्यात यावी, अशी मागणी तक्रार महिलेने केली आहे. भाजपच्या पदाधिकारी रिदा रशीद यांच्या तक्रारीवरून हा गुन्हा दाखल झाला आहे. या संदर्भात रिदा रशीद आणि माजी नगरसेवक राजन किणे यांनी पत्रकार परिषद घेऊन आव्हाड यांच्यासह सर्व आरोपींना अटक करण्याची मागणी केली. जितेंद्र आव्हाड यांच्याविरोधात दाखल केलेला विनयभंगचा गुन्हा मागे घेण्याच्या आणि त्याचा बदला घेण्याच्या उद्देशातून खोटा गुन्हा दाखल करून कट रचला, खोटे पुरावे देऊन पोलिस आणि न्यायालयाची दिशाभुल केली. न्यायालयात खोटी याचिका दाखल केली. खोट्या चित्रफिती तयार करून समाजमाध्यमांवर प्रसारित केल्या, असा आरोप रिदा यांनी केला. खोटा गुन्हा दाखल झाल्यामुळे कौटुंबिक वाद होऊन परिवाराचे मानसिक स्वास्थ बिघडले आणि त्याचबरोबर परिवाराला मानसिक त्रास झाला, असा आरोपही त्यांनी केला आहे. यातील, मुंब्यातील इस्टेट एजंट शबाना सोंधी (४०) हिला पोलिसांनी अटक केली असुन इतर आरोपींना अटक करण्यात यावी, अशी मागणी त्यांनी केली. या संदर्भात आमदार जितेंद्र आव्हाड यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. मात्र, त्यांची प्रतिक्रिया मिळू शकली नाही.




# नालासोपाऱ्यात पाईप गॅस जोडणी करतांना स्फोट; ४ जण होरपळले

**वसई** : नालासोपाऱ्यात पाईप गॅस जोडणी करण्याचे काम सुरू असताना स्फोट झाला आहे. शनिवारी संध्याकाळी साडेसहाच्या सुमारास ही घटना घडली. यात दुर्घटनेत ४ जण होरपळले असून त्यात ३ कामगार आणि एका रहिवाशाचा समावेश आहे. नालासोपारा पूर्वेच्या गाला नगर येथील चंद्रेश हिल्स या इमारतीत गुजरात गॅस कंपनीचे गॅस जोडणीचे काम सुरू होते. शनिवारी सायंकाळी गुजरात गॅस कंपनीचे तीन मजूर त्याठिकाणी गॅस जोडणी करण्याचे काम करीत होते. मात्र गॅस पुरवठा होत असलेल्या वाहिनीची झडप (वॉल) बंद न केल्याने अचानक मोठा स्फोट झाला. या स्फोटात तीन कामगार आणि एक रहिवासी होरपळले आहेत. अंगद कुमार, विशाल कुमार आणि सतीश कुमार अशी जखमींची नावे असून त्यांना नालासोपारा येथील खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले आहे. या घटनेची माहिती महापालिकेच्या अग्निशमन दलाला मिळताच घटनास्थळी पोहचून परिस्थितीवर नियंत्रण मिळविण्याचे काम सुरू केले आहे. यापूर्वी नालासोपारा पूर्वेच्या आचोळे रोडवरील द्वारकाहॉटेल जवळ गुजरात गॅस वाहिन्यांचा स्फोट झाला होता. त्यात हॉटेलला लागलेल्या भीषण आगीत तीन जण जण होरपळले होते. शहरातील काही भागात गुजरात गॅस कंपनीतर्फे पाईप गॅस पुरवठा करण्यात येत आहे. मात्र गॅस जोडण्या देत असताना कामादरम्यान होत असलेल्या निष्काळजीपणामुळे सातत्याने अशा घटना समोर येत आहे. याशिवाय अनुभव व प्रशिक्षण दिलेले कर्मचारी ही कामासाठी ठेवले जात नसल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.



# रिक्षाचालकाकडून अल्पववयीन मुलीवर लैंगिक अत्याचार; शोधासाठी पोलिसांची पथके



**वसई** : क्लासला जाणाऱ्या १७ वर्षीय तरुणीवर एका अनोळखी रिक्षाचालकाने बलात्कार केल्याचा धक्कादायक प्रकार वसईत उघडकीस आला आहे. वालीव पोलीस या रिक्षाचालकाचा शोध घेत आहेत. पीडित मुलगी वसई पूर्वेला राहते. बुधवार १७ जुलै रोजी ती घरातून संगणक क्लासला जाण्यासाठी निघाली होती. पुर्वेला ती एका रिक्षात बसली. तिच्या पायाला असलेले व्यंग रिक्षाचालकाने हेरले. बोलण्यात तिच्या विश्वास संपादन करून तुझे व्यंग ठिक करणारे औषध असल्याची थाप मारली. त्यामुळे मुलीचा विश्वास बसला. त्याने तिला क्लासला न नेता शिरसाड फाटा येथून वज्रेश्वरी येथील एका लॉजवर नेले. उपचाराच्या नावाखाली त्याने तिच्यावर अतिप्रसंग केला. मात्र नंतर पीडित तरुणी घाबरून तेथून निघून आली. नंतर हा प्रकार तिने आपल्या घरच्यांना सांगितल्यानंतर त्यांनी वालीव पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. वालीव पोलिसांनी अज्ञात रिक्षाचालकाविरोधात भारतीय न्याय संहितेच्या कलम १२७(२), ७४ सह पोक्सो कायद्याच्या कलम ८,९ (के) १०, १२ अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपी रिक्षाचालक हा सुमारे ३५ ते ४० वर्ष वयोगटातील आहे. आम्ही त्या मार्गावरील सीसीटीव्ही आणि लॉज तपासत आहोत अशी माहिती वालीव पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक कुंभार यांनी दिली.

# विरार पोलिसांच्या धमकीमुळे आत्महत्या, १० लाखांची नुकसानभरपाई देण्याचे मानवाधिकार आयोगाचे आदेश

**विरार :** विरार पोलिसांनी केलेल्या दमदाटीमुळे आत्महत्या करणाऱ्या अभय पालशेतकरच्या आईला १० लाखांची नुकसानभरपाई देण्याचे आदेश मानवाधिकार आयोगाने दिले आहेत. २१ एप्रिल रोजी अभयने आत्महत्या करण्यापूर्वी चित्रफित तयार करून पोलिसांनी धमकी दिल्याचे सांगितले होते. विरार पुर्वेच्या मनवेलपाडा येथे अभय पालशेतकर (२८) हा पत्नी आरोही पालशेतकर (२५) हिच्यासोबत रहात होता. वर्षभरापूर्वीच त्यांचे लग्न झाले होते. त्यांच्यात कौटुंबिक वाद होते. २१ एप्रिल रोजी त्याच्या पत्नीने अभय विरोधात पोलिसात तक्रार दिली होती. त्यानंतर पोलिसांनी अभयला बोलावून १४९ अंतर्गत नोटीस देऊन समज दिली होती. घरी आल्यावर अभयने घरातील हॉलच्या छताला साडीच्या सहायाने गळफास लावून आत्महत्या केली. आत्महत्येपूर्वी त्याने एक चित्रिफत तयार करून नातेवाईकांना पाठवली. सुनिल पवार नामक पोलिसाने टायर मध्ये घालून मारण्याची धमकी दिल्याने मी आत्महत्या करत



असल्याचे या चित्रफितीत त्याने सांगितले होते. परंतु विरार पोलिसांनी फक्त अभयच्या पत्नीवरच गुन्हा दाखल केला आणि पोलिसांची फक्त विभाागीय चौकशी करण्याचे निर्देश दिले होते. याच्या संतप्त प्रतिक्रिया उमटल्या होत्या. पोलिसाला सोयीस्कररित्या वाचवले जात असल्याचा आरोप करण्यात येत होता. त्यामुळे माध्यमात आलेल्या बातम्यांच्या आधारे राज्याच्या मानवाधिकार आयोगाने या प्रकरणाची दखल घेतली होती. आयोगाने पोलीस आयुक्तांना यासंदर्भात नोटीस पाठवून स्पष्टीकरण देण्याचे आदेश देण्यात आले होते. सुनावणीनंतर आयोगाने पोलिसांच्या कृतीला दोषी ठरवले आहे. पोलिसांनी केलेली दमदाटी आणि धमकी हे मानवी हक्कांचे उल्लंघन करणारी असल्याचे म्हटले आहे. याप्रकरणी मयत अभयची आई उज्वला पालशेकर यांना ६ आठवड्याच्या आत १० लाख रुपयांची नुकसान भरपाई देण्याचे आदेश दिले आहेत. जर या कालावधीत नुकसान भरपाई दिली नाही तर ८ टक्के व्याज दराने ती द्यावी लागणार असल्याचे आदेशात म्हटले आहे. एम.ए.सईद आणि के.के.तातेड यांच्या खंडपीठाने हे आदेश दिले आहे. याशिवाय पोलिसांनी नागरिकांशी कसे वागावे याबाबत मार्गदर्शन करण्यासाठी दर तीन महिन्यात कार्यशाळा आयोजित करण्याचे आदेशही राज्याच्या पोलीस महासंचालकांना दिले आहेत. मागील आठवड्यातच आयोगाने चावी विक्रेता मोह्ममद अली अहमद अली अन्सारी (३५) यालामाणिकपूर पोलिसांनी मारहाण केल्याप्रकरणी ३ लाखांचा दंड ठोठावला होता.

# मुंबई विमानतळावर १० कोटींहून अधिक रकमेचे सोने आणि वस्तू जप्त, सात जणांना अटक

**मुंबई :** गेल्या पाच दिवसांमध्ये मुंबई सीमाशुल्क विभागाच्या अधिकाऱ्यांनी विमानतळावर १३ किलो २४९ ग्रॅमहून अधिक वजनाचे सोने आणि इलेक्ट्रॉनिक्स वस्तू जप्त केल्या. त्यांची किंमत साडेदहा कोटी रुपये असून सीमाशुल्क विभागाने या कारवाईत सात जणांना अटक केली. सीमाशुल्क विभागाने २४ कारवायांमध्ये हे सोने व इलेक्ट्रॉनिक वस्तू जप्त केल्या आहेत. मेणामध्ये लवपलेली सोन्याची भुकटी, कच्चे सोने, सोन्याचे लगड यांचा त्यात समावेश आहे.



आरोपींनी कपडे, तसेच बॅगांमध्ये मोठ्या शिताफीने सोने लपवले होते. सीमशुल्क विभागाने १० ते १४ जुलै या काळात ही कारवाई केल्याचे अधिकाऱ्याने सांगितले. याप्रकरणी दुबई आणि अबुधाबी येथून आलेल्या प्रत्येकी दोन, तर जेद्दाह येथून आलेल्या एक भारतीय प्रवाशाला अटक करण्यात आली. त्यांच्याकडून ४८५० ग्रॅम सोने जप्त करण्यात आले. यापैकी काही सोने शरिरावर चिकटवण्यात आले होते, तर काही सोने कपडे, तसेच बॅगेत गुप्त जागात तयार करून लपवण्यात आले होते. याशिवाय मुझफ्फरनगर, उत्तर प्रदेश आणि हरिद्वार, उत्तराखंड येथील रहिवासी असलेल्या दोन भारतीय नागरिकांना औद्योगिक सुरक्षा दलाच्या (सीआयएसएफ) जवानांनी पकडले व सीमाशुल्क विभागाच्या ताब्यात दिले. त्यांच्याकडून १९५० ग्रॅम सोने जप्त करण्यात आले. सोन्याची भुकटी करून ती मेणात लपवण्यात आली होती. सुरक्षा रक्षकांपासून दडवण्यासाठी ते शौचालयात नळाखाली लपवण्यात आले होते. त्या कारवाईत ३०१० ग्रॅम सोने जप्त करण्यात आले असून त्याची किंमत एक कोटी ८९ लाख रुपये आहे. या सर्व कारवायांमध्ये अबुधाबी येथून आलेल्या १२ जणांना, दुबईहून आलेल्या दोघांना, तर बहरीन व शाहजाह येथून आलेल्या प्रत्येकी एका अशा एकूण १६ प्रवाशांनी बॅगांमध्ये सोने व इलेक्ट्रॉनिक वस्तू लपवल्या होत्या. त्याच्याकडून ३४३१ ग्रॅम सोने जप्त करण्यात आले. त्याची किंमत सव्वादोन कोटी रुपये आहे. त्यांना सीमाशुल्क अधिकाऱ्यांनी अडवले. या आरोपींना नोटीस देण्यात आली आहे. अन्य एका कारवाईत बँकॉकला जाणाऱ्या दोन परदेशी नागरिकांना सीमाशुल्क विभागाने विमानतळावर अडवले. त्याच्याकडून ४५ लाख रुपयांचे विदेशी चलनही जप्त करण्यात आले. त्यात ७ हजार ३०० युरो, अडीच हजार अमेरिकन डॉलर्स, २९ हजार पाऊंड आणि १२ हजार न्यूझीलंड डॉलर्स जप्त करण्यात आले. आरोपींनी लॅपटॉपच्या बॅगमध्ये चलन लपवले होते, असे सीमाशुल्क विभागाने सांगितले.

# कल्याणमधील वाढत्या चोऱ्यांनी दुकानदार त्रस्त

**कल्याण :** कल्याण पूर्व भागात घरफोड्यांचे प्रमाण वाढले आहे. दोन दिवसापूर्वी एका रात्रीत चोरट्यांनी चार ते पाच दुकाने फोडल्याची घटना ताजी असतानाच, बुधवारी रात्री चोरट्यांनी कोळसेवाडी, मानपाडा, रामनगर पोलीस ठाणे हद्दीत तीन घरफोड्या केल्या. यामध्ये एका पत्रकाराच्या दुकानाचे मुख्य लोखंडी प्रवेशव्दार तोडून चोरट्यांनी एक लाखाचा ऐवज चोरून नेला. पोलिसांनी सांगितले, पत्रकार सुभाष विश्राम कदम (५४) हे कल्याण पूर्वेतील दुर्गा माता मंदिर परिसरात राहतात. त्यांचे कोळसेवाडी शिवसेना शाखेसमोरील साईनाथ भवन इमारतीत एका गाळ्यात अन्नपूर्णा नावाने दुकान आहे. नेहमीप्रमाणे ते सकाळी दुकान उघडून रात्री दहा वाजता दुकान बंद करतात. बुधवारी रात्री त्यांनी नेहमीप्रमाणे दुकान बंद केले. दुकानात ग्राहक सामान विक्रीतून मिळालेले एक लाख पाच हजार रूपये तिजोरीत होते. चोरट्याने बुधवारी मध्यरात्रीच्या सुमारास या कदम यांच्या दुकानाचे लोखंडी प्रवेशव्दार धारदार हत्याराने तोडून दुकानात प्रवेश केला. दुकानातील सामानाची फेकाफेक करून




दुकानातील कुलुप बंद असलेला गल्ला तोडून चोरट्यांनी गल्ल्यातील एक लाख रूपयांची रोख रक्कम आणि काही सुट्टे पैसे चोरून नेले. नेहमीप्रमाणे बुधवारी सकाळी कदम दुकान उघडण्यासाठी आले तेव्हा त्यांना दुकानाचे प्रवेशव्दार तोडले असल्याचे दिसले. त्यांनी दुकानात पाहिले तर सामानाची फेकाफेक केली होती आणि गल्ल्याचे कुलूप तोडून त्यामधील रोख रक्कम चोरून नेली होती. कोळसेवाडी पोलीस ठाण्यात पत्रकार सुभाष कदम यांनी तक्रार केली आहे. कोळेगावातील कंत्राटदार अखिलेश चव्हाण यांच्या बंद घराच्या दरवाजाचा कडीकोयंडा तोडून चोरट्यांनी मंगळवारी रात्री दोन लाखाचा ऐवज चोरून नेला. मानपाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल आहे. चोळेगावातील रहिवासी राजकुमार यादव यांची ९० फुटी रस्त्यावर उभी करून ठेवलेली रिक्षा चोरट्यांनी मंगळवारी रात्री चोरून नेली. रामनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पाणेरी कपडा दुकान, केअर मेडिकल दुकान, अमृत पॅलेसबार दुकानांमध्ये चोऱ्या झाल्या आहेत. एका दुकानातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात चोर कैद झाले आहेत. त्याचा तपास पोलीस करत आहेत.

# आरपीएफच्या उपनिरीक्षकाला लाच घेताना अटक

**मुंबई :** केंद्रीय अन्वेषण विभागाने (सीबीआय) रचलेल्या सापळ्यात रेल्वे सुरक्षा दलाच्या(आरपीएफ) उपनिरीक्षकाला ७० हजारांची लाच घेताना अटक केली. बबलू कुमार असे अटक करण्यात आलेल्या उपनिरीक्षकाचे नाव असून तो नवी मंबईतील उरण येथे कार्यरत होता. तक्रारदाराचा जप्त करण्यात आलेला ट्रेलर सोडण्यासाठी आरोपी उपनिरीक्षकाने ७० हजार रुपयांची लाच मागितल्याचा आरोप आहे. तक्रारदाराने जप्त केलेला ट्रेलर सोडण्यासाठी रेल्वे न्यायालयात अर्ज दाखल केला होता, त्यावर २० जुलैला सुनावणी होणार होती. आरोपीने न्यायालयाच्या आदेशानंतर ट्रेलर सोडणार नसल्याची धमकी तक्रारदाराला दिली होती. त्यावेळी तक्रारीनंतर सीबीआयने मंगळवारी रचलेल्या सापळ्यात ७० हजार रुपयांची लाच घेतल्याचा आरोपाखाली बबलू कुमार याला अटक केली. आरोपीला न्यायालयाने १९ जुलैपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. याप्रकरणी आरोपीच्या कल्याण येथील घरी सीबीआयने शोध मोहिम राबवली.



## संपादकीय

संपादक : अनिल राजाराम पवार

# तंत्राधीन आहे जगती...

करोना या विषाणूने साऱ्या जगावर बेगुमान हल्ला चढविला होता; तेव्हा जगाचे अर्थकारण मंदीच्या तावडीत सापडू नये, यासाठी ज्यांनी प्रयत्न केले, त्यात मायक्रोसॉफ्ट कंपनीही होती. आज जगातल्या कोट्यवधी नागरिकांच्या आयुष्याला प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष स्पर्श करणारी मायक्रोसॉफ्ट ही खऱ्या अर्थाने सर्वव्यापी आहे. याचा विचित्र अनुभव शुक्रवारी साऱ्या जगाला आला. विमानसेवा बंद पडल्या. बँका खोळंबल्या. शेअर बाजार थंडावले. मायक्रोसॉफ्टची विंडोज प्रणाली वापरणारी जगातली लक्षावधी कार्यालये जागच्या जागी स्तब्ध झाली. शुक्रवार सायंकाळपर्यंत बहुतेक साऱ्या देशांमधील विंडोज प्रणाली जाग्यावर आल्या असल्या तरी एक छोटी कमतरता किंवा यंत्रणेतील अपुरेपण किती व्यापक परिणाम करू शकते; याचा जबर तडाखा जगाने अनुभवला. जगाचे व्यवहार बंद पडू नयेत, यासाठी मायक्रोसॉफ्टने करोना काळात काही कोटी लोकांचे कमी-अधिक प्रमाणात डिजिटल प्रशिक्षण केले होते. त्याच मायक्रोसॉफ्टला तंत्रसुरक्षा पुरविणाऱ्या क्राऊडस्ट्राईक या कंपनीच्या चुकीमुळे हा फटका बसला आहे. सुरुवातीला वाटले तसा हा सायबर हल्ला नव्हता, असे दिसते. सुदैवाने, मायक्रोसॉफ्ट सेवा देत असणाऱ्या सर्वच ग्राहकांच्या तंत्रसुरक्षेची जबाबदारी क्राऊडस्ट्राईक कंपनीवर नव्हती. तंत्रसुरक्षेची सॉफ्टवेअर ही सातत्याने अद्ययावत होत असतात. हे अपडेटिंगचे काम किचकट आणि जबाबदारीचे असते. आपली सिस्टिम वापरणाऱ्या कोट्यवधी ग्राहकांचे व्यवहार, त्यांची कामे आणि चलनवलन सुखरूप ठेवण्याची जबाबदारी मायक्रोसॉफ्टसारख्या कंपनीची असते. त्यामुळेच, सगळ्या प्रचंड जाळ्यावर सायबर हल्ला होऊ नये किंवा कोणतीही तांत्रिक त्रुटी राहू नये, यासाठी त्याच्या संरक्षणाची व्यवस्था करावी लागते. हेच काम ही कंपनी करीत होती. त्या कामात गडबड झाली आणि साऱ्या जगभर क्रमाक्रमाने अब्जावधी व्यवहार बंद पडत गेले. संगणक बंद पडणे किंवा ते पुन्हा पुन्हा सुरू करायला लागणे, ही कार्यालयांमधली अडचण महत्त्वाची असली तरी तिच्यापेक्षा विमान कंपन्यांचे चलनवलन किंवा बँकांचे व्यवहार ठप्प होणे, हे मोठे संकट होते. भारतासहित जगातील अनेक देशांमधील रुग्णालये आणि रुग्णसेवा विंडोज प्रणाली वापरतात; त्यांचे कामही खोळंबून पडले. यात गंभीर रुग्णांवरील उपचार तसेच शस्त्रक्रियांवरही परिणाम झाला. अमेरिकेत तातडीच्या नसणाऱ्या शेकडो शस्त्रक्रिया डॉक्टरांनी या अडचणीमुळे पुढे ढकलल्याच्या बातम्या येत आहेत. भारतातही अनेक ठिकाणी हे घडले असणार. या काही तासांच्या विश्वव्यापी संकटात एकूण किती अब्ज डॉलरचा चुराडा किंवा नुकसान झाले आहे; याचा अभ्यास आता पुढे काही महिने होत राहील. अगणित मानवी तास वाया गेले. आता साऱ्या यंत्रणा आणि व्यवस्था सुरू झाल्या असल्या तरी झालेले नुकसान लगेच भरून येणे शक्य नाही. असंख्य कंपन्या आणि कार्यालये अवलंबून असणारी सिस्टम अचानक थांबल्याने किंवा विचित्र वागू लागल्याने जगभरात काही तास जी प्रचंड असुरक्षिततेची आणि असहायतेची भावना निर्माण झाली; ती आपल्या तंत्रयुगातील अपरिहार्य पराधीनतेकडे बोट दाखविणारी आहे. आपली दैनंदिन आयुष्ये वाढत्या वेगाने आपण तंत्राधीन करत आहोत. त्यात काही चूक आहे, असेही नाही. तांत्रिक प्रगतीच्या या प्रपातात कोणीही बाजूला किंवा वेगळे राहू शकत नाही. कोणतेही तंत्रज्ञान किंवा तंत्रसाधने न वापरणाऱ्या व्यक्तींची आयुष्येही या तंत्रज्ञानाने ताब्यात घेतली आहेत. रुग्ण म्हणून आज रुग्णालयात गेलेले नागरिक त्यांचा काही दोष किंवा संबंध नसताना या आपत्तीत सापडले. तंत्रज्ञानाच्या उपयोजनाने समाजातील अनेक प्रश्न, समस्या, अंतर्विरोध कमी होतील, असा दावा सगळ्या तंत्रज्ञान कंपन्या करतातच; तो तसा चूकही नाही. मात्र, मानवी जीवन पूर्णपणे तंत्रज्ञानाधारित होत गेले आणि शुक्रवारी आले तशी संकटे येत गेली तर काय होईल; याही प्रश्नाचे उत्तर शोधावे लागणार आहे. मानवी समाजाची सारी रचनाच कृत्रिम प्रज्ञेच्या प्रभुत्वाने मोडकळीस येईल का, अशी चर्चा सध्या चालू आहे. शुक्रवारी दिवसभर जगात जे झाले; ते कोट्यवधी माणसांचे व्यावहारिक, भावनिक, आर्थिक आयुष्य काही काळापुरते तरी अस्थिर करून टाकणारेच होते. आता मायक्रोसॉफ्ट आणि क्राऊडस्ट्राईक या दोघांनीही निवेदन प्रसिद्धीस दिले असून दिलासा देण्याचा प्रयत्न केला आहे. शुक्रवारी, १९ तारखेलाच विज्ञान कथा दिन होता आणि जगभरात जे कल्पक लेखन झाले किंवा होते; त्यात सॉफ्टवेअर प्रणाली कोसळण्यातून काय संकटे येऊ शकतात, याचे चित्र रंगविले आहे. मात्र, सत्य हे कल्पितापेक्षा त्रासदायक असते; कारण ते प्रत्यक्षात भोगावे लागते. तंत्रयुगाच्या आधी मानवी समाज निसर्गाला शरण जाऊन पराधीनतेची कबुली देत. आता निसर्ग आणि तंत्रज्ञान या दोन्ही आघाड्यांवरची वाढती पराधीनता सांभाळत पुढे जायचे आहे.

# जागतिकीकरण आणि भारतीय समाजावर पररिणाम

जागतिकीकरण म्हणजे जगाच्या वाढत्या आर्थिक, तंत्रज्ञान आणि सामाजिक स्वरूपातील परस्परावलंबनाच्या प्रक्रियेतून उद्भवणारे बदल. आर्थिक जागतिकीकरणात व्यापार, गुंतवणूक, आणि आंतरराष्ट्रीय आर्थिक संस्थांच्या भूमिकेचा समावेश होतो. तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे जगातली माहिती, नवकल्पना, आणि संस्कृतींचे आदान-प्रदान सुलभ झाले आहे. सामाजिक जागतिकीकरणाने विविध संस्कृती, जीवनशैली आणि विचारांच्या प्रभावामुळे समाजात बदल घडवले आहेत. जागतिकीकरणामुळे देशांच्या आंतरराष्ट्रीय संबंधांत सुधारणा झाली आहे आणि विविध क्षेत्रांमध्ये सहकार्य वाढले आहे. प्राचीन काळात जागतिकीकरणाचा प्रारंभ व्यापार आणि प्रवासाच्या माध्यमातून झाला. भारतात व्यापाराच्या मार्गांनी (सिल्क रोड, समुद्री मार्गांद्वारे) विविध संस्कृतींचा प्रवेश झाला. भारतीय मसाले, कापड, आणि हिरे यांची ख्याती जगभर होती. वसाहत काळात ब्रिटिश, पोर्तुगीज आणि डच साम्राज्यांनी आपल्या व्यापारी आणि राजकीय हितासाठी भारतीय समाजावर प्रभाव टाकला. या काळात भारतीय समाजाच्या संरचनेत आणि जीवनशैलीत महत्त्वपूर्ण बदल घडले. इंग्रजी शिक्षण प्रणालीचा प्रारंभ, रेल्वे आणि टेलिग्राफ सारख्या सुविधा आणि आधुनिक कायदा प्रणाली यांचा उदय झाला.




### आधुनिक काळातील जागतिकीकरण :

१९५०-१९९० या काळात जागतिकीकरणाच्या प्रक्रियेतून सोव्हिएत संघ आणि अमेरिका यांच्यातील शीतयुद्धाच्या काळात आंतरराष्ट्रीय व्यापार आणि तंत्रज्ञानाच्या प्रगतीवर मर्यादा आल्या. परंतु १९९० नंतर उदारीकरण, खासगीकरण, आणि जागतिकीकरणाच्या धोरणाने भारतात मोठे आर्थिक आणि सामाजिक बदल घडवले. आंतरराष्ट्रीय संस्थांच्या मार्गदर्शनाखाली भारतीय अर्थव्यवस्था जागतिक बाजारपेठेत सामील झाली. यामुळे औद्योगिकीकरण, माहिती तंत्रज्ञान, आणि सेवा क्षेत्रात मोठी प्रगती झाली. भारताच्या आर्थिक विकासाच्या दरात वाढ झाली आणि जागतिक पातळीवर भारतीय कंपन्यांची उपस्थिती वाढली.

### भारतीय समाजावर जागतिकीकरणाचा प्रभाव

समाज रचना : जागतिकीकरणामुळे भारतीय समाजाच्या संरचनेत मोठे बदल झाले आहेत. पारंपरिक संयुक्त कुटुंब पद्धतीचा ह्रास होऊन आणखी विभक्त कुटुंबांची संख्या वाढली आहे. वाढत्या शहरीकरणामुळे गावातील लोकसंख्या कमी होत आहे, ज्यामुळे ग्रामीण समाजावर परिणाम झाला आहे. आधुनिक जीवनशैलीमुळे पारंपरिक मूल्यांचा ऱ्हास होऊन नवी विचारसरणी अंगीकारली जात आहे. नवीन तंत्रज्ञानामुळे आणि सोशल मीडियाच्या वापरामुळे व्यक्तींमधील संवादाच्या पद्धती बदलल्या आहेत.

धर्मावर प्रभाव : जागतिकीकरणामुळे धर्माच्या क्षेत्रातही बदल झाले आहेत. विविध धर्म, पंथ आणि सांस्कृतिक प्रभावांनी धार्मिक सहिष्णुता वाढवली आहे. परंतु, जागतिकीकरणामुळे धर्माच्या क्षेत्रात काही वेळा सांस्कृतिक संघर्षही निर्माण होतो. धर्मांतराचे प्रश्न, धार्मिक उन्माद आणि धार्मिक आक्रमकता यांसारख्या समस्यांमुळे समाजात तणाव निर्माण होतो. परंतु, जागतिकीकरणामुळे विविध धर्मांच्या विचारांचे आदान-प्रदानही सुलभ झाले आहे.

शिक्षणावर प्रभाव : जागतिकीकरणामुळे शिक्षण क्षेत्रात मोठे बदल झाले आहेत. आंतरराष्ट्रीय दर्जाचे शिक्षण, नवीन तंत्रज्ञान, आणि अध्ययन पद्धतींचा वापर वाढला आहे. परदेशातील विद्यापीठांमध्ये शिकण्यासाठी विद्यार्थ्यांची संख्या वाढली आहे. डिजिटल शिक्षणाच्या प्रगतीमुळे शिक्षणाची गुणवत्ता आणि उपलब्धता सुधारली आहे. विविध आंतरराष्ट्रीय शैक्षणिक उपक्रमांमुळे भारतीय विद्यार्थ्यांना नवीन संधी उपलब्ध झाल्या आहेत. ऑनलाइन शिक्षण आणि ई-लर्निंगच्या माध्यमातून शिक्षणाची पद्धत अधिक सुलभ झाली आहे.

महिलांवर प्रभाव : जागतिकीकरणामुळे महिलांच्या जीवनात मोठे बदल झाले आहेत. महिलांना रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत, परंतु त्याचबरोबर घरगुती जबाबदाऱ्या आणि कामाचा ताणही वाढला आहे. महिला सक्षमीकरणाच्या उपक्रमांमुळे महिलांची स्थिती सुधारली आहे, परंतु अजूनही लिंगभेदाच्या समस्या कायम आहेत. स्त्रिया आता शिक्षण, व्यवसाय, आणि राजकारण या क्षेत्रात पुढे येत आहेत. जागतिकीकरणामुळे महिलांना नवनवीन व्यवसायांच्या आणि उद्योजकतेच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत.

मुलांवर प्रभाव : जागतिकीकरणामुळे मुलांच्या शिक्षण, आरोग्य, आणि जीवनशैलीत बदल झाले आहेत. तंत्रज्ञानाच्या वाढत्या वापरामुळे मुलांच्या मानसिक आणि शारीरिक आरोग्यावर परिणाम होतो. परंतु, जागतिकीकरणामुळे मुलांना विविध शिक्षणाच्या आणि खेळांच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत. इंटरनेटच्या वापरामुळे मुलांना नवीन माहिती मिळवणे सोपे झाले आहे. परंतु, तंत्रज्ञानाच्या अतिवापरामुळे मुलांच्या सामाजिक कौशल्यांवर परिणाम होतो.

वृद्धांवर प्रभाव : जागतिकीकरणामुळे वृद्धांची स्थितीही बदलली आहे. पारंपरिक कुटुंबव्यवस्थेच्या ऱ्हासामुळे वृद्धांची काळजी घेणे कठीण झाले आहे. वृद्धांसाठी खासगी आणि सरकारी वृद्धाश्रमांची संख्या वाढली आहे. परंतु, वृद्धांना समाजात स्थान मिळवण्यासाठी अजूनही आव्हाने आहेत. सामाजिक सुरक्षेच्या योजना आणि वृद्धांसाठी विविध उपक्रमांमुळे वृद्धांची स्थिती सुधारण्याचे प्रयत्न होत आहेत. तंत्रज्ञानाच्या माध्यमातून वृद्धांना विविध सुविधा उपलब्ध झाल्या आहेत.

निष्कर्ष जागतिकीकरणामुळे भारतीय समाजात महत्त्वपूर्ण बदल घडले आहेत. परंतु, या बदलांच्या परिणामांवर विचार करणे गरजेचे आहे. यूपीएससी मुख्य परीक्षेत भारतीय समाजाच्या बदलत्या संरचनेवर आधारित प्रश्न विचारले जाऊ शकतात. या लेखाच्या आधारे विद्यार्थ्यांना जागतिकीकरणाच्या प्रभावाची सखोल समज प्राप्त होईल, ज्यामुळे परीक्षेत उत्तम उत्तर लिहिता येईल. जागतिकीकरणाचे विविध पैलू आणि त्याचा भारतीय समाजावर होणारा प्रभाव लक्षात घेऊन तयारी केल्यास विद्यार्थ्यांना परीक्षेत यशस्वी होण्यास मदत होईल.

# आर्थिक फसवणुकीसाठी देशासह परदेशात सीमकार्डचा पुरवठा, सीमकार्डचा पुरवठा करणाऱ्या तिघांना अटक

**ठाणे :** देशभरात शेअर बाजार गुंतवणूक तसेच विविध बतावण्या करून नागरिकांची आर्थिक फसवणुक करणाऱ्यांना मोबाईल सीमकार्डचा पुरवठा करणाऱ्या तीनजणांना ठाणे आर्थिक व सायबर गुन्हे विरोधी पथकाने छत्तीसगड येथून अटक केली आहे. या टोळीकडून ७७९ सीमकार्ड जप्त करण्यात आलेले असून त्यांनी यापुर्वी तीन हजार सीमकार्डचा वापर आर्थिक फसवणुकीच्या गुन्ह्यांसाठी वापरल्याची कबुली पोलिसांना दिली आहे. या टोळीने सक्रीय सीमकार्ड देशभरासह कंबोडीया, दुबई, चीन तसेच परदेशात सायबर गुन्ह्यांसाठी पुरविल्याची माहिती तपासात पुढे आली असून या गुन्ह्याच्या तपासात देशभरातील आर्थिक फसणुकीचे मोठे रॅकेट उघडकीस येण्याची शक्यता व्यक्त होत आहे. अफताब इरशाद ढेबर (२२), मनिषकुमार मोहित देशमुख (२७) आणि भाईजान उर्फ हाफिज लईक अहमद (४८) अशी अटक करण्यात आलेल्या तिघांची नावे आहेत. यातील अफताब आणि मनिषकुमार हे दोघे छत्तीसगडचे तर, हाफिज हा दिल्लीचा रहिवाशी आहे. गेल्या काही महिन्यांत ठाणे पोलिस आयुक्तालयातील वागळे इस्टेट परिमंडळाच्या हद्दीतील १६ सायबर गुन्हे दाखल झाले आहेत. यामध्ये शेअर बाजार गुंतवणूकीतून जास्त परतावा देण्याचे आमिष दाखवून तसेच काही जणांना भिती दाखवून त्यांची ऑनलाईनद्वारे आर्थिक फसवणुक करण्यात आली असून त्यासाठी तक्रारदारांना समाजमाध्यमाद्वारे वेगवेगळ्या लिंक पाठविण्यात आल्या होत्या. या सर्व गुन्ह्यांचा एकत्रित तपास करण्याचे आदेश ठाणे पोलिस आयुक्त आशुतोष डुम्बरे यांनी दिले होते. त्यानुसार ठाणे आर्थिक व सायबर गुन्हे विरोधी पथकाचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक प्रकाश वारके, पोलिस निरिक्षक प्रियंका शेळके, सहाय्यक पोलिस निरीक्षक मंगलसिंग चव्हाण




आणि प्रदिप सरफरे यांच्या पथकाने या गुन्ह्यांचा तपास सुरू केला. त्यामध्ये ३० मोबाईलमधून वेगवेगळ्या राज्यातील २६०० मोबाईल सीमकार्डद्वारे व्हॉट्सपि छत्तीसगड, त्रिपुरा आणि इतर ठिकाणाहून सक्रिय होत असून त्याचा आयपी हा हाँगकाँग येथील असल्याची पथकाला तांत्रिक तपासादरम्यान मिळाली. तसेच या सीमकार्डद्वारे नागरिकांना फसणुकीसाठी ज्या मोबाईलमधून कॉल करण्यात आले, त्याच्या आयएमईआय क्रमांकाचा पथकाने तपास केला असता, ते छत्तीसगड येथील असल्याचे उघड झाले. यानंतर पथकाने तेथे जाऊन अफताब आणि मनिष या दोघांना अटक केली. त्यांच्याकडून ७७९ मोबाईल सिमकार्ड, १ लॅपटॉप, २ वायफाय राऊटर, २३ मोबाईल, ५० क्रेडीट आणि डेबीट कार्ड, २० चेक आणि पासबुक जप्त करण्यात आली आहेत. या दोघांनी दिलेल्या माहितीच्या आधारे पथकाने दिल्लीतून हफिजला अटक केली, ठाणे आर्थिक व सायबर गुन्हे विरोधी पथकाचे पोलिस उपायुक्त पराग मणेरे यांनी दिली. सीमकार्ड खरेदीसाठी येणाऱ्या नागरिकांची दिशाभुल करून कंपनीचे काही प्रतिनिधी त्यांच्या नावाने दोन ते तीन सीमकार्ड खरेदी केली जातात. त्यापैकी एक सीमकार्ड त्यांना दिले जाते तर इतर सीमकार्ड स्वत:कडे ठेवून त्याची विक्री करतात. या गुन्ह्यातही असाच प्रकार समोर आला असून मोबाईल कंपनीचे तीन प्रतिनिधी पोलिसांच्या रडारावर आले आहेत. अफताब आणि मनिष या दोघे मोबाईल कंपनीच्या प्रतिनिधींकडून सीमकार्ड घेऊन ते देशभरात आर्थिक फसवणुकीचे गुन्हे करणाऱ्यांना एक ते दीड हजार रुपयांना विकत होते. तसेच हाफिज हा या दोघांकडून सीमकार्ड खरेदी करून ती दुबई येथे आर्थिक फसवणुकीचे गुन्हे करणाऱ्यांना विक्री करत असल्याची बाब तपासात समोर आली आहे, अशी माहिती पोलिस उपायुक्त पराग मणेरे यांनी दिली. या टोळीने रायपुर, विलासपुर आणि दिल्ली येथील सहकाऱ्यांच्या मदतीने त्यांच्या संपर्कातून सक्रिय सीमकार्ड कंबोडीया, दुबई, चीन आणि इतर देशात सायबर गुन्ह्यांसाठी पुरविल्याचे पोलिसांच्या प्राथमिक तपासात समोर आले आहे. या टोळीने यापुर्वी तीन हजार सीमकार्डचा वापर आर्थिक फसवणुकीच्या गुन्ह्यांसाठी वापरल्याची कबुली पोलिसांना दिली आहे. या कारवाईत जप्त करण्यात आलेल्या क्रेडीट आणि डेबीट कार्ड, चेक आणि पासबुकच्या तपासामध्ये ५ ते ६ बँक खात्यांचा गुन्ह्यासाठी वापर करण्यात आला असून याबाबत राजस्थान, हरियाणा, आंध्रप्रदेश, मध्यप्रदेश, तेलंगणा, गुजरात, केरळ येथील पोलिस ठाण्यांमध्ये १४ तक्रारी दाखल असल्याचे तपासात पुढे आल्याचे उपायुक्त मणेरे यांनी सांगितले.

## बेपत्ता महिला तपासात कुचराई, महिला पोलीस उपनिरीक्षक निलंबित

**नवी मुंबई :** बेपत्ता विवाहित महिला तपासप्रकरणी दिरंगाई केल्याप्रकरणी महिला पोलीस उपनिरीक्षक मीना व्हाडी यांना निलंबित करण्यात आले आहे. नवी मुंबईतील एक विवाहित महिला ६ तारखेला घरगुती कारणांनी घरातून निघून गेली. तिच्या सासरच्या लोकांनी तिचा शोध घेतला. मात्र ती नातेवाईक परिचित आणि माहेरीही गेली नसल्याने तिचे पती आणि वडिलांनी पोलीस ठाण्यात बेपत्ता झाल्याची तक्रार देण्यासाठी आले असता त्यांचा तात्काळ जबाब नोंद करून घेण्यात आला नाही. तसेच गुन्ह्याचे गांभीर्य ओळखून बेपत्ता महिलेचा तपास चालू केला नाही. महिला बेपत्ताप्रकरणी तात्काळ कायदेशीर प्रक्रिया सुरू करणे आदेश असताना दिरंगाई केली. हा अत्यंत बेजबाबदारपणा व हलगर्जीपणा असल्याचा ठपका ठेवण्यात आला आहे. त्यामुळे नैतिक दृष्ट्या जनमाणसांमध्ये पोलीस दलाविषयी संभ्रम व संशय निर्माण करून पोलीस दलाची प्रतिमा जनमाणसांत मलीन केली आहे, असा ठपका त्यांच्यावर ठेवण्यात आला आहे, अशी माहिती पोलीस उपायुक्त पंकज डहाणे यांनी दिली. बेपत्ता झालेली महिला शीळ फाटा येथील मंदिरात गेली होती. तिला चहातून गुंगीचे औषध टाकून तिच्यावर सामूहिक बलात्कार केला गेला, तसेच तिची निर्घृण हत्याही करण्यात आली होती. या प्रकरणी तीन आरोपींना अटक करण्यात आली होती. मात्र तिची बेपत्ता तक्रारीची वेळीच दखल घेतली असता पुढील प्रसंग गुदरला नसता, असा आरोप पीडित महिलेच्या नातेवाईकांनी केला.




## सैन्य दलात भरतीचे आमिष दाखवून डोंबिवली, कल्याणममधील भामट्यांकडून ४६ लाखाची फसवणूक

**कल्याण :** आपली सैन्य दलात ओळख आहे. आपण तुम्हाला त्या ठिकाणी नोकरीला लावून देतो. या बदल्यात रायगड, ठाणे, कल्याण, डोंबिवली परिसरातील नऊ बेरोजगार तरूणांकडून एकूण ४६ लाख ५० हजार रूपये उकळून त्यांना नोकरी न देता ते पैसे स्वताच्या आर्थिक फायद्यासाठी वापरणाऱ्या डोंबिवली, कल्याणमधील तीन भामट्यांच्या विरुध्द मानपाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हरिश्चंद्र गणपत जाधव (रा. दर्शन इमारत, चिंचपाडा रस्ता, ज्योतीनगर, कल्याण पूर्व), बाळकृष्ण गावडे (रा. संत ज्ञानेश्वर मार्ग, पंतनगर, घाटकोपर), नवनाथ पोपलेकर (रा. देसलेपाडा, डोंबिवली) अशी फसवणूक करणाऱ्या आरोपींची नावे आहेत. ज्ञानेश्वर वासुदेव भिलारे (५९) असे फसवणूक झालेल्या नागरिकाचे नाव आहे. ते सेवानिवृत्त आहेत. ते रायगड जिल्ह्यातील पोलादपूर तालुक्यातील दिवील गावचे रहिवासी आहेत. पोलिसांनी




सांगितले, आरोपी हरिश्चंद्र, बाळकृष्ण आणि नवनाथ यांनी संगनमत करून तक्रारदार ज्ञानेश्वर भिलारे यांच्यासह नऊ जणांना जानेवारी २०२० मध्ये संपर्क केला. त्यांनी आपली सैन्य दलात उच्चपदस्थ अधिकाऱ्यांची चांगली ओळख आहे. आपण सैन्य दलातील नोकरीचे काम या अधिकाऱ्यांच्या माध्यमातून करून देतो. यापूर्वी अशी कामे आपण केली आहेत, अशी थाप या तीन जणांनी फसवणूक झालेल्या तरूणांना मारली. ही नोकरी मिळविण्यासाठी प्रत्येकी चार ते पाच लाख रूपये द्यावे लागतील, असे भामट्यांनी तरूणांना सांगितले. सरकारी आणि सैन्य दलात नोकरी मिळते म्हणून तरूणांनी पैशांची जमवाजमव करून पैसे टप्प्याने भामट्यांच्या स्वाधीन केले. हे पैसे भामट्यांनी डोंबिवली पूर्वेतील उंबर्ली रस्त्यावरील विद्यानिकेतन शाळा परिसरातील ओशन हाईट्स इमारतीत आणि महाड येथे स्वीकारले. पैसे स्वीकारल्यानंतर वेगवेगळी कारणे देऊन भामटे तरूणांची दिशाभूल करत होते. मुलाखत, वैद्यकीय चाचण्या न करता तरूणांना सैन्य दलातील नेमणुकीची पत्रे मिळणार होती. भामट्यांनी तरूणांना सैन्य दलात नोकरी देण्याची बनावट नेमणूक पत्रे सैन्य दलाच्या शीर्षक पत्रावर तयार केली. ही पत्रे तरूणांना दिली. आपणास कोणतेही कष्ट न घेता सैन्य दलात नोकरी मिळाली या आनंदात तरूण होते. त्यांनी नेमणूक पत्रांची नंतर खात्री केली. त्यावेळी त्यांना ही पत्रे बनावट असल्याचे सांगण्यात आले. तरूणांनी या भामट्यांना संपर्क केला तर त्यांनी त्यांना प्रतिसाद देणे बंद केले. आपले पैसे परत देण्याचा तगादा तरूणांनी लावला तर त्यालाही भामट्यांनी दाद दिली नाही. आपली फसवणूक झाल्याचे कळल्यावर ज्ञानेश्वर भिलारे यांच्या पुढाकाराने तरूणांनी मानपाडा पोलीस ठाण्यात मंगळवारी तक्रार केली. पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे. पोलीस उपनिरीक्षक भारत ढेंबरे या प्रकरणाचा तपास करत आहेत.

# विधानसभेसाठी शिंदे गटाच्या मोर्चेबांधणीला सुरुवात; महायुतीत १०० जागांसाठी आग्रही

**मुंबई** : आगामी विधानसभा निवडणुकीत राष्ट्रवादीने ८० ते ९० जागांची मागणी केली असतानाच, शिवसेना शिंदे गटानेही महायुतीत १०० जागा मिळाव्यात, अशी मागणी पुढे केली आहे. दोन्ही मित्र पक्षांची मागणी लक्षात घेता भाजपच्या वाट्याला किती जागा येतील, असा प्रश्न भाजपच्या नेत्यांना पडला आहे. शिवसेना शिंदे गटाचे प्रमुख व मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत पक्षाच्या नेत्यांची बैठक पार पडली. त्यात महायुतीत भाजपकडे किमान १०० जागा मिळाव्यात, अशी मागणी करण्यात आली. मुख्य नेता व मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून त्यांच्या बरोबर गेलेल्या अपक्षांसह ४८ आमदारांसाठी त्यांचे मतदारसंघ कायम ठेवणार असल्याचा विश्वास शिंदे यांनी दिला आहे. याशिवाय



आणखी ५० मतदारसंघांची मागणी महायुतीत करण्यात येणार आहे. महायुतीत शिवसेनेची ताकद असल्याने पक्षाला १०० जागा मिळाव्यात, अशी भूमिका मांडण्यात आली. राज्य सरकारच्या लाडकी बहीण, लाडका भाऊ, मोफत एसटी प्रवास, कृषी पंप वीज माफी, पीकविमासारख्या योजना जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहचवण्याच्या सूचना शिंदे यांनी दिल्या आहेत. लोकसभा निवडणुकीत जागावाटपावरून झालेली दिरंगाई व त्यामुळे पक्षाला बसलेला फटका लक्षात घेऊन शिवसेना शिंदे गटाने व्यूहरचनेला सुरुवात केली आहे. तीन महिन्यांवर येऊन ठेपलेल्या विधानसभा निवडणुकीची ठाकरे गटाने तयारी सुरू केली आहे. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत मुंबईत शिवसेना–भाजप युतीत शिवसेनेने १९ जागा लढवल्या होत्या. १४ जागांवर शिवसेनेने विजय मिळविला. यातील आठ आमदार ठाकरे गटात तर सहा शिंदे गटात आहेत. ठाकरे गटाने सर्व मतदारसंघांतील इच्छुक उमेदवारांची यादी मागवली आहे. चार लोकसभा मतदारसंघांतील २४ विधानसभा मतदारसंघांवर ठाकरे गटाचा दावा कायम आहे. यात एक– दोन मतदारसंघ निष्ठावंत कार्यकर्त्यांसाठी जादा मागितले जाणार आहेत. या मतदारसंघातील संभाव्य उमेदवारांना कामाला लागण्याचे आदेश देण्यात आले आहेत. ठाकरे गटाची ही तयारी पाहून शिवसेना शिंदे गटानेही कंबर कसली आहे.

# माजी नगरसेविकांचे वायरल चित्रफित प्रकरण; आमदार गीता जैन समर्थकांविरोधात गुन्हा दाखल

**भाईंदर** : मिरा भाईंदर शहरातील भाजपच्या माजी नगरसेविकांच्या वायरल चित्रफिती प्रकरणी आमदार गीता जैन यांच्या समर्थकांविरोधात हा गुन्हा दाखल झाला आहे. यामुळे नरेंद्र मेहता आणि गीता जैन यांच्या राजकीय वाद अधिकच चिघळला आहे. माझ्या कार्यकर्त्यांवर गुन्हे दाखल करून मला या प्रकरणात गोवण्यात येत असल्याचा आरोप आमदार जैन यांनी केला आहे. भाईंदरचे माजी आमदार नरेंद्र मेहता यांनी १५ आणि १६ जुलै रोजी गोव्यात पक्षाची बैठक आणि सहलीचे आयोजन केले होते. त्यामध्ये भाजपाच्या माजी नगरसेविकांसह ५८ जण सहभागी झाले होते. गोव्यातील एका पंचतारांकित हॉटेलमध्ये हे सर्व जण सहलीसाठी आले होते. हॉटेलात माजी महिला नगसेविका नृत्य करत असतानाची चित्रफित समाजमाध्यमांवर वायरल करण्यात आली. आषाढी एकादशीला



वारकरीची भक्ती आणि माजी आमदार नरेंद्र मेहता यांची गोवा वारी असा आक्षेपार्ह मजकूर या चित्रफितीमध्ये टाकण्यात आला होता. ही खासगी चित्रफित वायरल करणाऱ्यांवर गुन्हा दाखल करावा या मागणीसाठी शुक्रवारी संध्याकाळी भाजपाच्या महिला कार्यकर्त्यांनी पोलीस ठाण्यात गोंधळ घातला होता. कायदेशीर कारवाई करण्यासाठी शुक्रवारी या माजी नगरसेविका आणि भाजप महिला आघाडीच्या नेत्यांनी नवघर पोलिस ठाण्याला घेराव घातला होता. त्यामुळे पोलिसांनी दिपक ठाकूर आणि सोनू यादव यांच्या विरोधात भारतीय न्याय संहितेच्या कलम ३५६ (२) ७९ अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पोलीस उपनिरीक्षक संदीप व्हसकोटी या प्रकरणाचा तपास करत आहेत. माजी नगरसेविका रुपाली शिंदे–मोदी (५०) यांच्या तक्रारीवरून हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मी अनुसूचित जातीची (एससी) असल्याने हेतुपुरस्सर माझी बदनामी करण्यासाठी ही चित्रफित विविध समाजमाध्यमावर प्रसारित करण्यात आल्याची तक्रार त्यांनी दिली होती. त्यामुळे तक्रार दाखल करण्यासाठी जातीचा आधार घेतल्याचा आरोप करण्यात येत आहे. याप्रकरणी आमदार गीता जैन यांच्या कार्यकर्त्यांवर गुन्हे दाखल झाल्याने त्या आक्रमक झाल्या आहेत. शनिवारी जैन यांनी पत्रकार परिषद घेऊन हल्ला बोल केला. माझ्या समर्थकांवर गुन्हे दाखल करून या चित्रफित प्रकरणात मुद्दाम मला खेचण्याचा प्रयत्न केला जात असल्याचे त्यांनी सांगितले. या चित्रफितीमध्ये आक्षेपार्ह काहीच नव्हते. उलट ज्या व्यक्तीने चित्रफित काढून आमच्या कार्यकर्त्यांकडे पाठवली त्याला आरोपी करणे गरजेचे होते. मात्र काही महिलांनी पोलिसांवर दबाव टाकून हा गुन्हा दाखल केला असल्याचा आरोप जैन यांनी केला. या चित्रफितीमुळे मेहता आणि जैन यांच्या राजकीय वाद वाढला आहे.

# कारेगांव येथे शाळा समिती गाठीत



**कारेगांव** : लोणार तालुक्यातील कारेगाव येथे दिनांक २० जुलै रोजी सकाळी ९ : ३० वाजता जिल्हा परिषद शाळेमध्ये बैठकीचे आयोजन करण्यात आले होते . त्या बैठकीला गावातील भरपूर नागरिक पालक/ पाल्य आणि महिला हजर होत्या. त्या बैठकीमध्ये शाळा समितीची निवड करण्यात आली त्यामध्ये सौ. अलका भागवत चव्हाण यांची बिनविरोध अध्यक्षपदी निवड करण्यात आली. आणि उपाध्यक्षपदी सौ.मंदाकिनी सतीश केंधळे यांची निवड सर्वानुमते करण्यात आली .या बैठकीमध्ये एकूण १३ सदस्याची निवड करण्यात आली असून बैठकीसाठी गावातील गुलाबराव केंधळे,शुभम चव्हाण, शंकर मातेकर, शालिक गायकवाड , गणेश ढव्हळे , विठ्ठल गायकवाड, ज्ञानेश्वर खोलगडे, शिवाजी टोलमारे ,रंगनाथ केंधळे, विजय केंधळे, कडुबा पंडागळे, मदन केंधळे, शेषराव गायकवाड , दिपक चव्हाण, शंकर चव्हाण, केशव गायकवाड ,(सैनिक)रवि तळेकर, चरण वानखेडे, शांतीराम गायकवाड , रमेश चव्हाण, पंजाजी चव्हाण,जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक विष्णू गायकवाड सर ,सिल्लोडे सर , सांगळे सर ,घुले सर, सर्व उपस्थित पालकांचे श्री होळकर सर यांनी आभार मानले.

# पालिका बसच्या धडकेत महिलेचा मृत्यू, संतप्त नागरिकांची बसची तोडफोड

**भाईंदर** : पालिकेच्या परिवहन सेवेच्या बसने धडक दिल्याने एका महिलेचा मृत्यू झाला आहे. गुरूवारी दुपारी भाईंदरच्या बंदरवाडी परिसरात ही घटना घडली. दुर्गा देवी बिष्ट (५८) असे या अपघातात मरण पावलेल्या महिलेचे नाव आहे. या घटनेनंतर संतप्त जमावाने बसची तोडफोड केली. गुरुवारी दुपारी दुर्गादेवी बिष्ट या भाईंदर पूर्वेच्या बंदरवाडी नाक्याजवळ बससाठी उभ्या होत्या. त्यावेळी आलेल्या



परिवहन सेवेच्या बसने त्यांना धडक दिली, त्यामुळे बिष्ट यांचा जागीच मृत्यू झाला.ही घटना घडताच परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले. संतप्त नागरिकांनी बसची मोडतोड केली. नवघर पोलिसांनी बस चालकाला ताब्यात घेतले आहे या प्रकरणी गुन्हा नोंदवून तपास सुरू असल्याची माहिती नवघर वरिष्ठ पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक धीरज कोळी यांनी दिली आहे.

OWNER, PRINTER, PUBLISHER & EDITOR BY ANIL RAJARAM PAWAR PRINTED AT M/S SOMANI PRNITING PRESS, UNIT NO.04, GROUND FLOOR, N.K. INDUSTRIAL ESTATE, OFF AREY ROAD, NEAR PARVASI IND. ESTATE, GATE NO. 2, GOREGAON EAST, MUMBAI-400063, & PUBLISH AT M/81, MARIAMMA NAGAR, WORLI, DR A.B. ROAD,BEHIND NEHRU CENTRE, WORLI MUMBAI - 400018. MAHARASHTRA , Email : amtnewspaper@gmail.com, Title-Code:- MAHMAR52789 , Mob. 9867110318

मालक, मुद्रक, प्रकाशक आणि संपादक अनिल राजाराम पवार यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं.४, ग्राउंड फ्लोअर, आरे रोड, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेट, गेट नं. २, गोरेगाव (पूर्व) मुंबई - ४०००६३ महाराष्ट्र येथून मुद्रित, एम/८१,मरिम्मा नगरए वरळी, डॉ. ए.बी. रस्ता, नेहरु सेंटरच्या मागे, वरळी,मुंबई ४०००१८, महाराष्ट्र येथून प्रकाशित केले. मो. ९८६७११०३१८, Email : amtnewspaper@gmail.com, Title-Code:- MAHMAR52789